# Regional Marathi Text Bulletin, Aurangabad
## Date – 07 October 2023
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## आकाशवाणी औरंगाबाद
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – ०७ ऑक्टोबर २०२३ सायंकाळी ६.१०

****

- आशियाई क्रीडा स्पर्धेत २८ सुवर्णांसह एकशे सात पदकं जिंकत भारताची ऐतिहासिक कामगिरी
- काकवीवरील वस्तू आणि सेवा कर २८ टक्कयांवरून ५ टक्के तर बाजरीचं सुटं पीठ करमुक्त
- राज्यात माती परीक्षणासाठी आता टपाल कार्यालयाची मदत

आणि

- कोतवाल परीक्षा पेपर फुटी प्रकरणी जालना इथं तीन संशयित ताब्यात

****

चीनमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतानं आजवरची सर्वाधिक विक्रमी एकशे सात पदकं जिंकत ऐतिहासिक कामगिरी केली आहे. आज भारतानं ६ सुवर्ण, चार रौप्य आणि दोन कांस्य पदकांची कमाई केली. एकूण २८ सुवर्ण, ३८ रौप्य आणि ४१ कांस्य पदकं जिंकत भारत या स्पर्धेच्या पदकतालिकेत चौथ्या स्थानावर कायम आहे. आज स्पर्धेच्या १४ व्या दिवशी कबड्डी स्पर्धेत भारताच्या पुरुष आणि महिलांच्या संघांनी सुवर्णपदक पटकावलं. तीरंदाजीच्या कंपाउंड प्रकारात वैयक्तिक स्पर्धेत भारताच्या ज्योती सुरेखा तसंच ओजस देवतळेनं सुवर्णपदक पटकावलं. याच प्रकारात अभिषेक वर्माने रौप्य पदक तर आदिती गोपीनाथ हिने कांस्यपदक पटकावलं. चिराग शेट्टी आणि सात्विक साईराज यांनी बॅडमिंटन दुहेरीत कोरीयाचा पराभव करत सुवर्णपदक जिंकलं. तर क्रिकेट मध्ये अफगाणिस्तानविरुद्धच्या अंतिम सामन्यातील पहिला डाव पावसामुळे थांबला, मात्र, भारतीय पुरुष क्रिकेट संघाला वेगवान धावसंख्येमुळे सुवर्णपदक देण्यात आले.

महिला हॉकी संघानं जपानला हरवत कांस्य पदक जिंकलं. मल्ल दिपक पूनिया ने ८६ किलो वजनी गटात फ्रिस्टाईल कुस्ती मध्ये रौप्य पदक पटकावलं. बुद्धिबळ स्पर्धेत पुरूष तसंच महिला संघांनी रौप्य पदक पटकावलं.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व खेळाडूंचं अभिनंदन केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी सर्व खेळाडूंशी १० तारखेला संवाद साधणार आहेत.

तीरंदाजीत तीन सुवर्ण पदक जिंकणारा ओजस हा नागपुरचा रहिवासी असून, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्याचं अभिनंदन केलं आहे. ओजसच्या आई अर्चना देवतळे यांनी आकाशवाणीशी बोलताना या शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या –

> ***आमची पूर्ण फॅमिली आणि एरियातील लोकं सुद्धा खूप खूश आहेत. ढोल ताशे लावून त्यांनी पूर्ण एन्जॉय केला त्याला गोल्ड मेडल मिळाल्यावर. सातवीपासून त्याने शिकायला सुरूवात केली होती. पण जसं तो दहावीत आला आणि त्याचं त्या गेमविषयी समर्पण पाहिलं, त्याची जिद्द पाहिली, चिकाटी पाहिली. त्याचं कॉन्स्नट्रेशन आणि बारा–बारा तास ती प्रॅक्टीस करणं, मग तेव्हापासून ठरवलं की नाही त्याला आता आपण सपोर्ट करायचा. त्याला सातऱ्याला जावं लागलं. आणि तिथं त्याने ह्या सगळ्या गोष्टी केल्या. त्यानं नागपूर सातारा ही जर्नी होती ती फार कठीणची झाली त्याच्यासाठी.***

****

काकवीवरील वस्तू आणि सेवा कर २८ टक्कयांवरून ५ टक्के तर बाजरीचं सुटं पीठ करमुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितलं आहे. वस्तू आणि सेवा कर – जीएसटी परिषदेची ५२ वी बैठक सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्ली इथं झाली, त्यानंतर पत्रकारांशी बोलताना अर्थमंत्र्यांनी ही माहिती दिली. वर्णनात्मक माहिती असलेल्या पाकीटबंद बाजरीच्या पिठावर पाच टक्के जीएसटी आकारला जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं. औद्योगिक वापरासाठीच्या अल्कोहोल वर १८% जीएसटी आकारण्यात येणार आहे. जीएसटी लवादाच्या अध्यक्षांची वयोमर्यादा कार्यकाळ ६७ वर्षांवरून ७० वर्ष करण्यात आल्याची माहितीही केंद्रीय अर्थमंत्र्यांनी दिली.

****

राज्याचा कृषी विभाग आता माती परीक्षणावर भर देणार असून, यासाठी टपाल कार्यालयाची मदत घेतली जाणार आहे. यासाठी तालुका स्तरापर्यंत माती परीक्षण केंद्रे अद्ययावत केली जाणार आहेत. कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी ही माहिती दिली. ते आज लातूर जिल्ह्यात लोदगा इथं फिनिक्स फाउंडेशनच्या कृषी महाविद्यालय, बांबू टीश्यू कल्चर, बांबू फर्निचर प्रकिया उद्योगाला भेट दिल्यानंतर बोलत होते. बांबू हे पिक मातीचे आरोग्य वाढवणारं असल्यामुळे लातूर आणि सातारा येथे प्रायोगिक तत्वावर होणारी बांबू लागवड आता बीडमध्येही केली जाणार आहे, सर्व जिल्ह्यात बांबू लागवडीसाठी अनुदान देण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचंही कृषीमंत्र्यांनी सांगितलं.

****

दोन हजार रुपयांच्या नोटा बदलण्यासाठी, भारतीय रिझर्व्ह बँकेनं दिलेली मुदत आज संपत आहे. यापूर्वी ३० सप्टेंबरला, रिझर्व्ह बँकेनं या नोटा बदलण्यासाठी एका आठवड्याची मुदत वाढवून दिली होती. आतापर्यंत ८७ टक्के नोटा बँकेत जमा करण्यात आल्या आहेत.

****

इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी युद्धाची घोषणा केली आहे. हमास या पॅलेस्टिनी दहशतवादी संघटनेनं केलेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर पंतप्रधानांनी हा निर्णय घेतला आहे. हमासने आज पहाटेपासून इस्त्रायलच्या सात शहरांवर रॉकेट हल्ले सुरू केले असून यात अनेक जण ठार झाले असून तीनशे लोक जखमी झाले आहेत. हमासने या हल्ल्यांची जबाबदारी स्वीकारली असून इस्रायलविरोधात लष्करी कारवाई सुरू केली आहे.

भारतानं इस्रायलमध्ये राहणाऱ्या भारतीय नागरिकांना सतर्क राहण्यास आणि सुरक्षा नियमांचं पालन करण्यास सांगितलं आहे.

****

नांदेड जिल्हा परिषदेच्या गट–क सरळसेवा पदभरतीअंतर्गत परीक्षा आजपासून नांदेड इथं सुरू झाल्या. चार परीक्षा केंद्रावर ही परीक्षा सुरू असून केंद्र परिसरात ११ तारखेपर्यंत जिल्हादंडाधिकारी अभिजीत राऊत यांनी प्रतिबंधात्मक आदेश निर्गमीत केले आहेत.

****

जालना जिल्हा प्रशासनाकडून कोतवाल पदासाठी घेण्यात येत असलेल्या परीक्षेचा पेपर फुटल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जालना शहरातल्या एका परीक्षा केंद्रावरून पेपर लिहिण्यासाठी इलेक्ट्रॉनिक लपकरणाचा वापर करणाऱ्या तीन संशयितांना ताब्यात घेतलं. पोलीस निरीक्षक रामेश्वर खनाळ यांनी ही माहिती दिली. जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसह सदर परीक्षा केंद्रावर जाऊन पाहणी केली. या प्रकरणी गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितलं.

****

बीड जिल्ह्यातल्या गेवराई तालुक्यातील चकलंबा पोलीस ठाण्याच्या हद्दीत, पोलीस पथकानं वाळूच्या अवैध साठ्यावर छापा टाकून ५०० ब्रास वाळूसह ८० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांच्या पथकानं ही कारवाई केली. यात ५०० ब्रास वाळूसह, पाच ट्रॅक्टर-केणी, एक ट्रॅक्टर ट्रॉली, एक मोटारसायकल आणि दोन मोबाईल असा एकूण ८० लाख रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

****

साडे तीनशेव्या शिवराज्याभिषेक वर्षानिमित्त विश्व हिंदू परिषदेच्या वतीनं काढण्यात आलेल्या शौर्य जनजागरण यात्रेचं आज धाराशिव जिल्ह्यात स्वागत करण्यात आलं. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची पालखी मिरवणूक काढण्यात आली. उमरगा तालुक्यातील अचलबेट इथून निघालेली ही शौर्य जनजागरण यात्रा उमरगा, लोहारा, नळदुर्ग, तुळजापूर मार्गे धाराशिव शहरात पोहोचली. टाळ आणि संबळच्या नादात निघालेल्या या यात्रेत वारकरी, विद्यार्थी, नागरिक, मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते.

****

वीज महावितरण कंपनीच्या छत्रपती संभाजीनगर इथल्या वाळूज महानगर शाखेने सप्टेंबर महिन्यात एक लाख ३७ हजार रुपयांची वीजचोरी उघडकीस आणली होती. या प्रकरणी आठ जणांविरोधात वीजचोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे सर्व आरोपी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात वडगाव कोल्हाटी इथले रहिवासी आहेत.

****

एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत धर्मशाला इथं झालेल्या सामन्यात बांगलादेशनं अफगाणिस्तानचा सहा गडी राखून पराभव केला. अफगाणिस्तानने दिलेलं १५७ धावांचं लक्ष्य बांगलादेशनं ३४ षटकं आणि चार चेंडुत चार गड्यांच्या मोबदल्यात साध्य केलं.

दिल्लीत सध्या दक्षिण आफ्रिका आणि श्रीलंका संघात सामना सुरू आहे. श्रीलंकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण स्वीकारलं. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा दक्षिण अफ्रिकेच्या पाच बाद ४०२ धावा झाल्या होत्या.

****

गडचिरोली इथं एका महिला नक्षलीने आज आत्मसमपण केलं. रजनी उर्फ कलावती समय्या वेलादी असं या नक्षलीचे नाव असून, ती छत्तीसगड राज्यातल्या बिजापूर जिल्ह्यातील ईरुपगट्टा इथली रहिवासी आहे. तिच्यावर चार चकमकी, एक खून आणि एका जाळपोळीच्या गुन्ह्याची नोंद आहे. आत्मसमर्पण योजनेंतर्गत तिला साडेचार लाख रुपयांची मदत करण्यात येणार आहे

****

महाराष्ट्रातील ४५ टक्के भागातून मोसमी पाऊस परतला आहे. यंदा राज्यात मोसमी पाऊस उशिरा दाखल झाला, मात्र ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये चांगला पाऊस झाल्यामुळे शहरी भागात पुरेशा प्रमाणात पाण्याची उपलब्धता असल्याचं हवामान खात्यानं म्हटलं आहे.

****

भारतीय वायूसेनेचे वायू दल प्रमुख विवेक राम चौधरी यांचा संदेश उद्या सकाळी सात वाजून दहा मिनिटांनी आकाशवाणीवरून प्रसारित करण्यात येणार आहे. त्यामुळे उद्या रविवारी सकाळी आमच्या केंद्रावरचं मराठी बातमीपत्र सकाळी सात वाजून वीस मिनिटांनी प्रसारित होणार आहे.

****